# नॅब जिल्हयातील क्रियाशिल व आदर्श संस्था....

# आणि यशस्वी वाटचाल......

१६ फेब्रुवारी १९९४ मध्ये संस्थापक सदस्य यांचे खंबीर नेतृत्वाखाली कै. डॉ. मंगेश मेहता, डॉ. मिलींद गोखले, श्री. प्रकाश पाथरे, श्री. सुचयअण्णा रेडिज, श्री इब्राहीम दलवाई, श्री प्रकाश गगनग्रास एकत्रित येवून व इतर सहकार्यांचा समावेश करून राष्ट्रीय अंध कल्याण संघ (नॅब) रत्नागिरी शाखोची स्थापना चिपळूण येथे झाली. ॲड. विवेक रेळेकर यांची अध्यक्ष व श्री प्रकाश गगनग्रास यांची सेक्रेटरी म्हणून नेमणूक करणेत आली.

**<u>नॅब संस्थेचे प्रामुख्याने दोन महत्वाचे उद्देश म्हणजे अंधत्व निवारण व अंधाचे पूनवर्सन हे होय.</u>**

नॅबचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रमध्ये आहे. याची राज्य शाखा नाशिक येथे व केंद्रिय शाखा स्वतंत्रपणे कार्य करित आहे व सर्व शाखांचे एकत्रिकरण राज्य शाखेमध्ये आहे. नॅबची प्रत्येक शाखा ही शिस्तप्रिय पध्दतीने व नॅबच्या कार्याला वाहून देणाऱ्या महत्वांकाक्षी व्यक्ती या कार्यान प्रेरीत अशी मंडळी सहभागी आहेत.

नॅबचे संस्थेच्या उभारणीस व कार्यामध्ये उद्देशाप्रमाणे प्रगतीकरणेकरिता प्रथमत: रत्नागिरी जिल्हयातील अंधाचे सर्व्हेक्षण करून त्यांची यादी करणेत आली. त्यासाठी गावोगावी भेटी देवून तेथील पहाणी केली. या अभ्यासामध्ये मोतिबिंदूच्या शस्त्रक्रिया होत नसल्याने अनेकांना अंधतव आलेले आहे व अनेंकांना अंधतव येवू घातलेले आहे असे दिसून आले. यामुळे नॅबने प्रथमत: लोकांना अंधत्वापसून दूर करणेचे पाऊले टाकली.

यासाठी सिव्हील हॉस्पिटल, कॉटेज हॉस्पिटल यांचे सहकार्य घेवून कॉटेज व घरडा हॉस्पिटलमध्ये मोतिबिंदू शस्त्रक्रियाची शिबीरे घेवून मोफत शस्त्रक्रिया करणेस सुरूवात घली सदर शस्त्रक्रिया साधे पध्दतीने व जाड भिंगाचा चष्मा देवून लोकांना दृष्टी प्राप्त होवून लागली. या कामी लायन्स नॅब आय हॉस्पिटल मिरज यांचा सहभाग ही फार मोलाचा होता.

याचवेळी भिंगारोपन (लेन्स) पध्दतीने अधिक सुस्पष्ट दिसण्याचे मोतिबिंदू शस्त्रक्रिया विकसीत झालेली होती. भिंगारोपन करून मोतिबिंदू शस्त्रक्रिया करणेची पध्दत राबविणेत संस्थेने ठरविले यासाठी १५ एप्रिल १९९८ रोजी जिल्हाधिकारी श्री मधुसुदन साळवी यांचे शुभ हस्ते “नॅब नेत्र चिकित्सा केंद्र” आयशाबी कॉम्प्लेक्स चिपळूण येथे सुरूवात करणेत आली. यासाठी श्री शरीफ राजीवटे यांनी त्यांची जागा मोफत उपलब्ध करून दिली. याच केंद्रामध्ये डोळयांची तपासणी करणे मोतिबिंदू शंस्त्रक्रिया करणेसाठी पूर्णवेळ देणारे डॉक्टरांची नेमणुक करणेत आली. मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी लागणारे ऑपरेशन थेअटर डॉ. मिलींद गोखले यांचे सहकार्याने “घरडा हॉस्पिटल” येथे उपलब्ध झाले. डोळे तपासणी व शस्त्रक्रियेसाठी लागणारी सर्व मशिनरीज नॅबचे उपलब्ध

करून थोडयाच कालावधित मोफत व सवलतीच्या दरामध्ये डोळे तपासणी डोळयांचे नंबर्स व मोतिबिंदू शस्त्रक्रियाची सोय ही प्रसिध्दीस आली.

नॅब नेत्र चिकित्सा केंद्राला मिळालेल्या नेत्र रूग्णांच्या प्रतिसादामुळे नॅबची स्वतंत्रपणे मोठी जागा मिळविणेच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. मारूती कन्ट्रक्शनचे श्री सुहास मोरे यांनी सवलतीच्या दरामध्ये वेसीच्या मारूतीजवळ जागा उपलब्ध करून दिली. याच कालावधीत लायन्स आय कॉम्प्रेहेन्सिव्ह सेंटर मिरजचे अध्यक्ष डॉ. अनिल कुलकर्णी व कै. ए. डी. देशपांडे यांचे कल्पकतेने व सहकार्याने लायन्स इंटरनॅशनल कडून सुमारे १५ लाखाचे मशिनरीज व ॲम्बुलन्सच्या स्वरूपात मंजूर झाले. लायन्स क्लब चिपळूणने मोलाचे सहकार्य केले.

नॅबचे १६ जानेवारी १९९९ रोजी नॅबचे स्वत:चे वास्तूत “नॅब लायन्स आय हॉस्पिटल” यानावाने लायन्स क्लबचे प्रांतपाल श्री. बाबासाहेब पवार, उपजिल्हाधिकारी श्री. राजेंद्र निंबाळकर, नॅब राज्य शाखोचे अध्यक्ष श्री अशोकजी बंग, सेक्रेटरी श्री रामेश्वर कलंत्री, सिव्हील सर्जन मधुकर साळुंखे, आमदार श्री भास्करशेठ जाधव इ. अनेक नामवंताचे उपस्थितीत उद्घाटन होवून हॉस्पिटल दिमाखात सुरू झाले.

“नॅब लायन्स आय हॉस्पिटल” व नॅब नेत्र चिकित्सा सेंटरला, नेत्र रूग्णाच्या अधिक प्रतिसादामुळे दोन निवासी नेत्रतज्ञांची नेमणूक करणेत आली.

नॅब आय हॉस्पिटलमध्ये नोव्हेंबर २००० रोजी बीन टाक्यांची मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी सुमारे दहा लाख किंमतीचे फेको मशिन उपलब्ध होवून त्याचे उद्घाटन कै. रामचंद्र उर्फ भाऊ कदम यांचे शुभहस्ते होवून फेको मशिनद्वारे त्यांचे डोळयांचे मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली व त्यांना चांगल्या प्रकारची दृष्टी प्राप्त झाली. या फेकोच्या शस्त्रक्रियेसाठी डॉ. सागर जोगळेकर व डॉ. योगेश राजगुरू यांचे विशेष सहकार्य लाभत असे त्यामुळे हॉस्पिटलच्या लौकीक वाढू लागला.

या हॉस्पिटलची प्रगतीचा व कर्याचा अहवाल पाहून व कोकणातील एकमेव डोळयांच्या शस्त्रक्रियेत कार्य करणारी संस्था असल्याने जसलोक हॉस्पिटल मुंबई यांनी सुमारे दोन लाख किंमतीचे मशिनरी व चेअर युनिट नॅब संस्थेला देणगी दिली. डॉ. भाकरे सातारा यांनी स्लीट लॅम्प या मशिनरी स्वरूपात देणगी दिली. तर रोटरी क्लब चिपळूण यांनी फ्रिज, कै. बागेवाडीसर, धनवानी कॉन्ट्रक्टर व श्री पटेल यांनी टी.व्ही., श्री सचिनशेठ यांनी फ्रिज देणगी स्वरूपात दिलेल्या आहेत. नॅबचे आय हॉस्पिटलमध्ये अनेक आधुनिक मशिनरीज असून पेशन्टच्या नोतेवाईकासाठी प्रत्यक्ष चालू असणारी शस्त्रक्रिया टी.व्ही. वर दाखविणेची सोय उपलब्ध केलेली आहे. शस्त्रक्रिया झालेल्या पेशंटना रहाणेसाठी व जेवणाची मोफत सोय उपलब्ध केलेली आहे.

कोकणातील नॅब ही एकमेव संस्था आहे ती अंधत्व निवारण व अंधाच्या कल्याणासाठी सातत्याने कार्यक्रम राबवित आहे यासाठी श्री सुचय रेडीज यांनी तन–मन–धनाने नॅबसाठी वाहून घेतलेले आहे.

नॅबचे उपक्रमसाठी चिपळूण शहरात डि.बी.जे. कॉलेज समोर, शालोम हॉटेलच्या मागे भव्य डोळयाचे हॉस्पिटल आज दिमाखात उभे राहीले असून भव्य दिव्य अश्या या डोळयाच्या हॉस्पिटल मुळे कोकणाच्या

शिरपेचात मानाचा तुरा रोवल्या सारखाच असून आज डोळयाच्या सर्व आजार व विकार हे एकाच छताखाली उपचार करण्यात येतात. त्यामध्ये पुढील काळामध्ये मोतिबिंदू शस्त्रक्रिया यांच्या बरोबरीने काचबिंदू, तिरळेपणा, लासूर, ग्रीन लेझर, तसेच आय बॉल कलेक्शन व नेत्र पेढीचा प्रस्तावीत प्रकल्प, तसेच नेत्रदानाचा प्रचार आणि प्रसार यावर भर दिला जाणार असून यादृष्टीकोनातून नियोजनाची सुरवात करण्यात येत आहे.

बाई रतन बाई घरडा पुनर्वसन केंद्र स्वत:च्या प्रशस्त जागेत सुरू होत असून अंध पुनर्वसन केंद्र १०० स्के.फू. जागा उपलब्ध असून त्यामध्ये व्ययक्तिक मार्गदर्शन, तंत्रशिक्षण, या बरोबरीने अंध बांधवांची अदयावत सुची शासकीय योजना, त्यांच्या पर्यंत पुरवीने, ब्रेल लायब्ररी, संगणक विभाग इ. गोष्टींचा पाठपुरावा करणार आहे. आतापर्यंत जसा लोकसहभाग व लोकवर्गणी यासाठी लाभली तशीस याही प्रकल्पांना मिळो व संचालक मंडळावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरो. ही सदिच्छा.

नॅब आय हॉस्पिटलच्या मध्यमातून डिसेंबर २०१३ अखेर पर्यंत १४१७ नेत्र शिबीरे घेण्यात आली, सदर शिबीरामध्ये ९९६६१ रूग्णांची तपासणी करून उपचार देण्यात आले, तसेच हॉस्पिटल मधील बाहया रूग्ण तपासणी द्वारे १६३४९७ रूग्णांची डोळयांची तपासणी करून उपचार देण्यात आले. अंधन्व निवरण व प्रतिबंधन उपाय क्षेत्रात २९९२२ रूग्णांचे मोतिबिंदू शस्त्रक्रिया आणि ३०८ इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. संस्थेमार्फत १९ फेब्रुवारी २०१२ रोजी अंध मेळावा घेण्यात आला. सदर मेळयामध्ये सुमारे ४०० अंध बांधव व भगिनींनी सहभाग घेतला.

अनेक अंध व्यक्तींना त्यांचे पूनवर्सन व्यवसायसाठी सहकार्य करून त्यांना त्यांचे पायावर उभे रहाणेस मदत केलेले आहे. अंध व्यक्तींना शिक्षणासाठी वहया, पुस्तके फी वगैरेसाठी सहकार्य केरीत आहे. अंध मेळावे घेवून अंधाच्या समस्या विचारात घेवून त्यांना सहकार्य व मार्गदर्शन नॅब करीत आहे. जिल्हयातील अंधाना नॅबचा फार मोठा आधार आहे. नॅब म्हणजे अंधाचे कल्याण व अंधत्व निवारण ! अंधाचे कल्याण व अंधत्व निवारण म्हणजे नॅब अशी परिभाषा लागू पडते. अशा परोपकारी व जिल्हयाचे भूषण असणाऱ्या सामाजिक संस्थेला परमेश्वररूपी आशिर्वाद आपल्याकडून मिळो.

श्री संदिप नलावडे.